जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ६८६ दिनांक - ०८/१०/२०२२

### हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

### हडपसर पोलीसांकडुन अवैध धंदयावर छापे
### साडे आठ लाखांचा मुद्देमाल जप्त १४ आरोपी अटक
### 'हातभट्टी दारु विक्रेता तडीपार'

१) हातभट्टी दारु विक्रेता **दादाराव गोरख गोरे वय-४३ रा. स.न.४०५, डांगमाळी आळी, हडपसर पुणे. हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याचे विरूध्द यापुर्वी अवैध्द रित्या दारू विक्रीचे एकुण ०७ गुन्हे हडपसर पोलीस स्टेशन येथील आहेत. आरोपी दादा गोरख गोरे याने त्याच्या वरील दाखल गुन्हे हे** अवैध मार्गाने आर्थिक फायदा व्हावा या करीता केलेला असल्याचे तपासात निष्पन्न होत असल्याने त्यांचे विरुध्द मा.पोलीस उप- आयुक्त परि.०५, पुणे शहर यांनी **महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१),(ब-ब)** अन्वये त्यांच्याकडील कडील **तडीपार आदेश क्र. ४२/२०२२, दिनांक** २७/०९/२०२२ रोजी पासुन नमुद इसमासपुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय तसेच पुणे जिल्हा हद्यीतुन **२( दोन) वर्षाकरिता** तडीपार करण्यात आलेले आहे.

### 'साडेपाच लाखांचा गांजा, चरस मुद्देमाल जप्त'

**२)** दिनांक ०२/१०/२०२२ रोजी हडपसर पोलीस ठाणे, कडील पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री विश्वास डगळे, तपास पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अविनाश शिंदे व अंमलदार असे हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलींग करीत असताना, जाधव निवास, न्हावले अपार्टमेंन्ट, काळेपडळ, हडपसर या ठिकाणी असलेल्या सार्वजनिक मोकळ्या जागेत वानवडी पोलीस स्टेशन कडील **अंमली पदार्थ विक्री करणारा आरोपी व एनडीपीएस गुन्हयामध्ये रेकॉर्ड वरिल तडीपार आरोपी** लॉरेन्स राजु पिल्ले वय ४२ वर्षे धंदा रा. मांजरी ग्रामपंचायत शाळेसमोर, गोपाळपट्टी सोपानपार्क प्लॅट नंबर- ३०८, मांजरी ता.हवेली जि.पुणे. व त्यांचे दोन साथीदार २)ऋषिकेश जगदीश भोजणे वय ३२ वर्षे रा. प्लॅट नंबर- ३०८, साईश्रध्दा गोपाळपट्टी मांजरी ता.हवेली जि.पुणे. ३)मंगेश सुनिल पवार वय ३२ वर्ष रा. हर्षद अपार्टमेंन्ट प्लॅट नंबर- २४, ससाणेनगर हडपसर पुणे हे **१ किलो ४४८ ग्रॅम गांजा** ओला सुका बोंडे व फुले असलेला व **१२० ग्रॅम चरस वजनाचे** (चरस) घट्ट पातळ द्रव्य काळया रंगाचे गोळे हे प्लॅस्टीक पिशव्यामध्ये पॅकिंग करीत असताना मिळुन आले आहे. **नमुद आरोपी कडुन १ किलो ४४८ ग्रॅम गांजा आणि १२० ग्रॅम चरस, मोबाईल हॅंन्डसेट, वजनकाटा, गुन्ह्याकरीता वापर केलेली होन्डा ॲक्टीवा मोपेड असा किं.रू ५,५०,५२५/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं १२४५/२०२२, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब) (ii) (ब),२९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे हे करीत असुन आरोपींची दि.०८/१०/२०२२ पर्यंत पोलीस कस्टडी घेण्यात आली आहे.

आरोपी लॉरेन्स राजु पिल्ले यास मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांनी दिनांक २८/०१/२०२२ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा हददीतुन दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आले असताना त्या आदेशाचा भंग करुन तो मुदतीपुर्वी कसलीही परवानगी न घेता पुणे शहर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अंमली पदार्थाची विक्री करीत असताना मिळून आला आहे.

## ‘मटका जुगार अड्डयावर छापा ११ आरोपी अटक ०३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त’

३) दिनांक ०६/१०/२०२२ रोजी भुई आळी, नवीन कॅनॉलच्या बाजुला, फुंरसुगी येथे पत्र्याच्या पडवीत मोकळया जागेत स्वताःच्या आर्थिक फायद्यासाठी कल्याण मटका जुगार घेताना/खेळताना ११ आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन कल्याण मटका जुगार साहित्यासह, ९ मोबाईल व ४ दुचाकी वाहने असा **एकुण २,९५,०७० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं १२६३/२०२२, महाराष्ट्र जुगार ॲक्ट कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पो.अंम. रामेश्वर नवले हे करीत आहेत.

पोलीस आयुक्त श्री. अमिताभ गुप्ता पुणे शहर यांनी कार्यभार घेतलेनंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन गंभीर गुन्हयांत कठोर व कडक कारवाई करणेबाबत व गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल असे कायमच निर्देश दिले आहेत.

सदरची कामगिरी श्री. नामदेव चव्हाण अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर,श्रीमती नम्रता पाटील पोलीस उप-आयुक्त परीमंडळ-५ पुणे शहर,श्री. बजरंग देसाई, सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर, त्यांचे मार्गर्शनाखाली श्री. अरविंद गोकुळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर, श्री. दिगंबर शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. विश्वास डगळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक विजयकुमार शिंदे, पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, तृप्ती खळदे महिला पोलीस उप-निरीक्षक, पोलीस अंमलदार वसिम सय्यद, गिरीधर एकोर्गे, बाबासाहेब शिंदे, तपास पथकाचे पोलीस अंमलदार, सुशील लोणकर, अविनाश गोसावी, संदीप राठोड, सचिन जाधव, शाहीद शेख, प्रशांत दुधाळ, निखील पवार, प्रशांत टोणपे, सचिन गोरखे, सुरज कुंभार, भगवान हंबर्डे, अनिरूध्द सोनवणे, अतुल पंधरकर यांचे पथकाने कारवाई केली आहे.

